जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2024
पुढारी

# मुलींच्या मोफत उच्च शिक्षणाच्या निर्णयास मान्यता

## शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठकीत राज्य सरकारच्या मुलींच्या मोफत उच्च शिक्षणाच्या निर्णयास मान्यता देण्यात आली.

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. ३६ पैकी ३० विषय मान्य करण्यात आले, तर सहा विषयांवर पुढील बैठकीत चर्चा करण्याचा निर्णय झाला.

व्यवस्थापन परिषद बैठकीत दूरशिक्षण केंद्र वाढविण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल मान्य करण्यात आला. सांगली जिल्ह्यातील अण्णासाहेब डांगे महाविद्यालयाच्या चौकशीसाठी नियुक्त समितीच्या अहवालास मान्यता देण्यात आली. विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या काही देय रकमा देण्याचा निर्णय झाला. अधिविभागांमध्ये कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय बैठकीत झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2024
तरुण भारत

# दूरशिक्षणची केंद्र वाढवण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल मंजूर

प्रतिनिधी
कोल्हापूर

अधिविभागांना कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम देण्याच्या शिफारशी मंजूर करण्यात आल्या. तसेच दूरशिक्षणची केंद्र वाढवण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल मंजूर करण्यात आला. हा निर्णय शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीला १९ पैकी ११ व्यवस्थापन सदस्य उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के तर सचिवपदी डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ३६, विषय मांडण्यात आले. यापैकी ३० विषयांना मंजूरी दिली. तर ६ विषय पुढच्या बैठकीत घेण्याचा निर्णय घेण्यात आला. कर्मचाऱ्यांची थकबाकी देण्याचा विषय पुढे ढकलला. प्रधानमंत्री पी. एम. उषा अहवाल स्विकारला. वृक्ष लागवडीसाठी क्षेत्र उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. विशेष कक्ष स्थायी समितीचा कार्यवृतांत स्विकारला. प्रशासकीय गुणवत्ता अभियानचा अहवाल स्विकारला. डॉ. रामकृष्ण आरांके यांनी गणित विषयासाठी शिष्यवृत्ती दीड लाख रूपयांची देणगी तर चंद्रकांत भोसलश यांनी एक लाख रूपयांची देणगी दिली आहे. ही देणगी स्किारण्यास मान्यता देण्यात आली. अण्णासाहेब डांगे कॉलेजसंदर्भातील चौकशी समितीचा अहवाल स्विकारला. कल्याण निधी, चेंजिंग स्टाफ बैठकीचा व बांधकाम समितीचा अहवाल स्विकारला.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2024
तरुण भारत

# 'शिक्षणातून कौशल्याधिष्ठीत नागरिक घडवणे आवश्यक'

**कोल्हापूर :** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करीत असताना कौशल्याधिष्ठित जागतिक पातळीवरील नागरिक तयार घडवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठांतर्गत राजर्षी शाहू सभागृहात आयोजित महाविद्यालयातील प्राचार्यांच्या बैठकीत ते बोलत होते. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सहाय्यक आयुक्त संजय माळ, डॉ. सागर डेळेकर यांनी मार्गदर्शन केले. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. रामचंद्र पवार, कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2024

लोकमत

# घाळी महाविद्यालय विद्यापीठात प्रथम

गडहिंग्लज : शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये निम्म शहरी विभागात येथील डॉ. घाळी महाविद्यालयाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाने प्रथम क्रमांक पटकाविला. सलग चौथ्यांदा हा मान महाविद्यालयाला मिळाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते संस्थाध्यक्ष डॉ. सचिन घाळी, सहसचिव गजेंद्र बंदी, प्र. प्राचार्य दत्ता पाटील, डॉ. मनोहर पुजारी यांनी हे पारितोषिक स्वीकारले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एम. शिंदे, परीक्षा संचालक डॉ. अजयसिंह जाधव, वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी यावेळी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2024
तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत ७२६ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल–२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. आत्तापर्यंत ७२६ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाले. गुरूवारी चार अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी १ हजार ७७९ पैकी १हजार ४८० विद्यार्थी उपस्थित होते. तर २९९ विद्यार्थी अनुपस्थित होते. परीक्षांमध्ये भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यातून ६, सातारा जिल्ह्यातून २ असे ८ गैरप्रकाराची नोंद करण्यात आली. परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार संबंधीत विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ७२६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील ७२६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बॅचलर ऑफ स्पेशल (लॉ), मास्टर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्षे) आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये झाल्या. परीक्षेला १ हजार ७७९ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २९९ विद्यार्थी अनुपस्थित होते. दि. १८ रोजी बॅचलर ऑफ फार्मसी आदी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. भरारी पथकाकडून सांगलीतून ६ व सातारा जिल्ह्यातून २ अशा आठ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2024
लोकमत

# कॉमर्स कॉलेजमध्ये विज्ञान अभ्यासक्रमांना मान्यता

## डॉ. आर. एस. नाईक यांनी दिली माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी.एस्सी. केमिस्ट्री आणि बी.एस्सी. स्टॅटिस्टिक्स या विषयांच्या पदवी अभ्यासक्रमांना राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मान्यता दिली आहे. प्रभारी प्राचार्य डॉ. आर. एस. नाईक यांनी ही माहिती दिली.

रत्नाप्पा कुंभार यांनी पश्चिम महाराष्ट्रामध्ये १९५७ मध्ये वाणिज्य शाखेंतर्गत पहिल्या महाविद्यालयाची स्थापना केली होती आणि विद्यमान व्यवस्थापनाने काळाची गरज ओळखून विज्ञान विद्याशाखेच्या अभ्यासक्रमांच्या मान्यतेसाठी परिश्रम घेतले.


यामुळे वाणिज्य शाखेबरोबरच विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेची पदवी घेण्याची संधी महाविद्यालयाने उपलब्ध करून दिली आहे.

या मान्यतेसाठी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, सदस्य ॲड. अमित बाडकर, ॲड. वैभव पेडणेकर यांचे मार्गदर्शन लाभल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2024
लोकमत

# परशुराम वडार यांना पीएच.डी.

किणी : येथील परशुराम शंकर



वडार यांना शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कॉम्प्युटर सायन्स विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांनी "डायग्नोसीस ऑफ थायरॉइड मशीन लर्निंग अप्रोच" या विषयावर प्रा. डॉ. उर्मिला पोळ मार्गदर्शनाखाली प्रबंध सादर केला होता. त्यांना डॉ. के. एस. ओझा, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. व्ही. पी. भोसले, डॉ. एन. सी. माळी, डॉ. अमित आसलकर, प्रा. डॉ. प्रकाश पवार, प्रा. डॉ, आर. आर. मुधोळकर, कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

19 JUL 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



भवताल

डॉ. रसिया पडळकर

**मासेमारी हा भारतासह अनेक देशातील लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे आणि मासे हे प्रमुख अन्नदेखील. पण या दृश्य मासेमारीच्या मागोमागच सावलीसारखी येते ती अदृश्य मासेमारी.**

# अदृश्य मासेमारीचे बळी



मछली जल की है रानी, जीवन उसका है पानी... रंगीबेरंगी माशांनी समुद्रतळ बहरलेला असतो. पण असा शेकडो रंगीबेरंगी माशांचा अदृश्य मासेमारीमुळे हकनाक जीव जात असतात असं जर तुम्हाला सांगितलं तर तुमचा विश्वास बसेल? मासेमारी हा भारतासह अनेक देशातील लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे आणि मासे हे प्रमुख अन्नदेखील. पण या दृश्य मासेमारीच्या मागोमागच सावलीसारखी येते ती अदृश्य मासेमारी.

पारंपरिक मासेमारीच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. वेगवेगळी जाळी, त्यांचे आकार, समुद्रात शिरण्याचे दिवस अशा अनेक बाबींवर मासेमारीचे यश अवलंबून असते. अनेक वर्षांच्या अनुभवातून ज्ञानाचे हे संचित तयार झालेले असते. अर्थातच, मासेमारी जशी मोठ्या प्रमाणात व्यावसायिक होऊ लागली आणि मोठ्या कंपन्या या क्षेत्रात उतरल्या, तसा मासेमारीचा पेहरा अधिकाधिक भेसूर होत गेला. ऋषी कपूर, कमल हसन आणि डिम्पल यांच्या 'सागर' या सिनेमात आपल्याला लहान मच्छिमार आणि मोठे ट्रॉलर्स यातील संघर्ष बघायला मिळतो. या भेसूर चेहऱ्याची अनेक रूपे आहेत, त्यातीलच एक म्हणजे घोस्ट फिशिंग। म्हणजेच अदृश्य मासेमारी.

मासेमारीसाठी सगळ्यात महत्त्वाचे असते ते जाळे। पूर्वीच्या काळी ही जाळी, वनस्पतीजन्य धाग्यांपासून म्हणजेच, अंबाडी, ताग, बांबू, विशिष्ट प्रकारचे गवत, घायपात अशाप्रकारच्या धाग्यांपासून बनलेली असायची. पण आताच्या प्लास्टिक, नायलॉनच्या जगात कोणता मासेमार किंवा कोणती कंपनी असे नैसर्गिक धाग्यांपासून बनलेले लवकर कुजणारे जाळे वापरेल? आता प्रत्येकाकडे नायलॉनचे जाळे असते. हेच नायलॉनचे जाळे भुतासारखे समुद्रातील माशांचा हकनाक जीव घेते. मासेमारी करताना विविध कारणांनी जाळी तुटतात आणि समुद्रात खाली अडकून बसतात. अनेकदा मच्छिमार किंवा मासेमारी करणाऱ्या कंपन्या खराब झालेली जाळी समुद्रातच फेकून देतात. ही जाळी वेगवेगळ्या ठिकाणी अडकून बसतात. कधी प्रवाळ बेटांमध्ये, कधी बुडालेल्या जहाजांच्या अवशेषांमध्ये, तर कधी खडकांच्या कपाऱ्यांमध्ये. नायलॉनच्या या जाळ्यांमध्ये, अनेक समुद्रात स्वच्छंद विहार करणारे मासे, डॉल्फिन, समुद्री कासवे, साप असे सर्व प्रकारचे जीव अडकून बसतात आणि त्यांचा केविलवाणा मृत्यू होतो. प्रवाळ बेटांच्या पुनरुज्जीवन टोकांमध्ये ही प्रचंड जाळी अडकतात आणि प्रवाळ बेटांभोवती असणाऱ्या वैविध्यपूर्ण जीवसृष्टीचे गळे आवळतात. या जाळ्यांमध्ये अडकल्यानंतर त्यांना स्वतःला त्यातून सोडवून घेता येत नाही. मग कधी उपासमारीने, कधी महत्त्वाचा अवयव कापला गेल्याने रक्तस्राव होऊन, कधी बचाव न करता आल्याने मोठ्या माशाचे भक्ष्य होऊन तर कधी गळा आवळल्याने या जिवांचा मृत्यू होतो. हे मासे अन्न म्हणून आपल्याला तर मिळत नाहीतच; पण आपल्या मासेमारीच्या हव्यासाने आणि चुकीच्या पद्धतीमुळे त्यांचा मात्र मृत्यू होतो.

अर्थातच मासेमारीचे प्रमाण ज्या भागात जास्त आहे अशा ठिकाणी या तुटलेल्या जाळ्या जास्त प्रमाणात आढळतात; पण समुद्रातील विशिष्ट अशा प्रवाहांमुळे या जाळ्या, टायर आणि प्लास्टिकचा इतर कचरा वाहत वाहत पॅसिफिक समुद्रात पश्चिम आणि पूर्व भागात जमा झालेला आहे. इथे या समुद्री कचऱ्याची प्रचंड मोठी बेटे तयार झालेली आहेत. याला ग्रेट पॅसिफिक गार्बेज पॅच असे म्हटले जाते. या भागात अशा प्रकारच्या घोस्ट फिशिंगचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

आपण वापरत असलेल्या, खात असलेल्या सर्वच वस्तू कशाप्रकारच्या नैतिक आणि मानवी शोषणातून निर्माण झालेल्या आहेत याचे किमान भान जरी आले तर कदाचित सर्व काही अलबेल असल्याचा आपला समज थोडा विचार करायला भाग पाडेल. एकीकडे करोडो कोटी रुपये खर्चून होणारे दान आणि दुसरीकडे जागतिक भूक निर्देशांकात १२५ देशात १११ व्या क्रमांकावर असलेला आपला भारत देश हा एक प्रचंड मोठा अदृश्य मासेमारीचे आगार आहे की काय असा प्रश्नदेखील पडू शकेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2024
लोकमत

# मुलींच्या मोफत शिक्षण निर्णयास मान्यता

## विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या गुरुवारी झालेल्या व्यवस्थापन परिषद बैठकीत राज्य सरकारच्या मुलींच्या मोफत उच्चशिक्षणाच्या निर्णयास मान्यता देण्यात आली. बैठकीत ३६ पैकी ३० विषय मान्य करण्यात आले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. राज्य सरकारने नुकताच मुलींच्या मोफत शिक्षणाचा अध्यादेश काढला आहे.

पुढील बैठकीत सहा विषयांवर चर्चा करण्याचा निर्णय झाला. बैठकीत विविध विषय मांडण्यात आले. चौकशी समिती, कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम आदी विषयांवर चर्चा झाली. विद्यापीठातील अधिविभागांमध्ये कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय बैठकीत झाला.

विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या काही देय रकमा देण्याचा निर्णय यावेळी झाला. दूरशिक्षण केंद्र वाढविण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल मान्य करून सांगली जिल्ह्यातील अण्णासाहेब डांगे महाविद्यालयाच्या चौकशीसाठी नियुक्त समितीच्या अहवालास मान्यता दिली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.